**प्रेसनोट दि. २०.०९.२०२३**

लोकसेवक श्री. उमेश नवाळे, ग्रामविकास अधिकारी, नांद्रे, तत्कालीन अतिरिक्त कार्यभार बुधगाव ग्रामपंचायत ता. मिरज, जि. सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/- रुपये लाच मागणी केल्याने त्यांचे विरुद्ध सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे राहते घराचे मुल्यांकन करून खरेदी-विक्रीचा ना-हरकत दाखला देण्यासाठी लोकसेवक श्री. उमेश नवाळे, ग्रामविकास अधिकारी, नांद्रे, तत्कालीन अतिरिक्त कार्यभार बुधगाव ग्रामपंचायत ता. मिरज, जि.सांगली यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/- रुपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.२८.०८.२०२३ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि.२८.०८.२०२३, दि.२९.०८.२०२३, दि.०१.०९.२०२३ व दि.०४.०९.२०२३ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये लोकसेवक श्री. उमेश नवाळे, ग्रामविकास अधिकारी, नांद्रे, तत्कालीन अतिरिक्त कार्यभार बुधगाव ग्रामपंचायत ता. मिरज, जि.सांगली यांनी तक्रारदार यांचे राहते घराचे मुल्यांकन करून खरेदी-विक्रीचा ना-हरकत दाखला देण्यासाठी स्वतः करीता ४०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती ३०,०००/- रूपयांची लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. उमेश नवाळे, ग्रामविकास अधिकारी, नांद्रे, तत्कालीन अतिरिक्त कार्यभार बुधगाव ग्रामपंचायत ता. मिरज, जि.सांगली यांचेविरुध्द एमआयडीसी कुपवाड पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल झाला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे, पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री संदीप पाटील, श्री.विनायक भिलारे पोलीस निरीक्षक श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार ऋषीकेश बडणीकर, प्रितम चौगुले, अजित पाटील, रविंद्र धुमाळ, पोपट पाटील, सलीम मकानदार, धनंजय खाडे, उमेश जाधव, रामहरी वाघमोडे, चंद्रकांत जाधव, सिमा माने, सुदर्शन पाटील, चालक अनिस वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३-२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ यावर तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अँप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक ★ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली ★ सत्यमेव जयते

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner